जगातील अण्णा भाऊ प्रमाणेच
महान तरीही उपेक्षित असलेल्या
लेखक, कलावंतांना
सादर अर्पण...

## लेखकाचे चार शब्द...

विद्रोही साहित्याचे जनक अण्णाभाऊ साठे हा लेख सादर करताना आनंद होत आहे. मास्को रशिया येथे १ ऑगस्ट २०२० रोजी ''अण्णाभाऊ साठे जन्मशताब्दी साहित्य संमेलन'' संपन्न करण्याचे ठरले होते. या संमेलनाचे अध्यक्षपद मी भूषवावे असे मला सांगण्यात आले होते. कोरोना, लॉकडाऊन, आंतरराष्ट्रीय विमान प्रवास बंदी अशा जागतिक संकटांमुळे संमेलन होऊ शकले नाही.

जागतिक विचार मंचावर अण्णाभाऊ साठे यांच्या संदर्भात विचार मांडताना अण्णाभाऊ जागतिक लेखक म्हणून मान्यता प्राप्त ठरले ते कोणत्या वाङ्मयीन वैशिष्ट्यामुळे? आणि मराठी साहित्यात अण्णाभाऊंचे नेमके स्थान कोणते? असे दोन प्रश्न प्रामुख्याने माझ्या मनात तयार झाले होते. या प्रश्नांच्या उत्तरात जे जाणवले ते म्हणजे हे छोटेखानी लेखन. मराठी साहित्याचे अण्णाभाऊंचे वाचक, अभ्यासक, संशोधक या लेखनाचे स्वागत करतील, साधक-बाधक चर्चा करतील याचा मला विश्वास वाटतो.

माझे मित्र भगवान अवघडे आणि अमर गायकवाड यांचे या निमित्ताने आभार मानतो. त्यांच्या तगाद्यामुळेच हे लेखन झाले आहे.

**प्रा. डॉ. बाबुराव गुरव**
तासगाव
९७६६३९६९९०

१ ऑगस्ट २०२२
अण्णा भाऊ साठे जयंती

## विद्रोही साहित्याचे जनक

# अण्णाभाऊ साठे

अण्णाभाऊ साठे यांचा जीवनकाळ १ ऑगस्ट १९२० ते १८ जुलै १९६९ असा आहे. अभिनेता, वगनाट्य तमाशात प्रत्यक्ष सादरीकरण करणारा कलावंत म्हणून त्यांनी १९३० पासूनच बालकलाकार म्हणून सुरूवात केली. त्यांना बालपणी शिक्षण मिळू शकले नाही. रूढ अर्थाने ते पहिलीही पास नव्हते. इच्छाशक्तीच्या जोरावर १९३४ पासून त्यांनी प्रथम मराठी वाचन आणि नंतर लेखन करण्यास प्रारंभ केला. एक तपाच्या सलग प्रयत्नानंतर ते चांगले लिहू लागले. अतिशय साधे हस्ताक्षर आणि शुद्ध लेखनातील त्रुटींनी अखेरपर्यंत त्यांची पाठ सोडली नाही. जात, अस्पृश्यता आणि जीवघेण्या दारिद्र्यामुळे अण्णाभाऊंचे बालपण कष्टाचे, उपासमारीचे आणि उपेक्षेचे असेच गेले.

अण्णाभाऊ आयुष्यभर प्रवासी मजुराचे झोपडपट्टीतले, कष्टाचे काटकसरीचे, तणावाचे जीवन जगले. जीवन जगण्यासाठी, कुटुंबियांना जगविण्यासाठी अण्णाभाऊंना सतत काम, मजुरी शोधत फिरावे लागले.

अशा दर्दभऱ्या जीवनातील अतीव संघर्षातून अण्णाभाऊंच्या मधला उमदा लेखक, कलावंत उभा राहिला. सुरूवातीला १९३६ साली भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जीवनदानी सभासद बनले. आयुष्यभर ते त्या